## प्रकरण तिसरे

# वाकाटककालीन स्थळे व पुरातत्वीय अवशेष

वाकाटक राजवंशाने विदर्भातील नंदिवर्धन आणि वत्सगुल्म येथून दक्षिण भारतावर ३०० वर्षे राज्य केले. संपूर्ण दक्षिण भारत वाकाटकांच्या ताब्यात नसला तरी दक्षिण भारतातील बहुतेक प्रदेशावर त्यांनी राज्य केले संपूर्ण विदर्भ व मराठवाडा प्रदेशावर त्यांचे राज्य केले होते. तसेच मराठवाड्यावर त्यानी राज्य केले असले तरी मराठवाड्यात सर्वत्र या काळातील पुरातत्वीय अवशेष आढळत नाहीत. मराठवाड्यातील काही भागात वाकाटककालीन पुरातत्वीय अवशेष आढळतात. मराठवाड्यात औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा, वेरुळ आणि पैठण, उस्मानाबाद जिल्ह्यात तेर व उस्मानाबाद, नांदेड जिल्ह्यात कंधार आणि नांदेड तसेच लातूर जिल्ह्यात खरोसा व लातूर येथे या काळातील मंदिरस्थापत्य, गुहास्थापत्य, विहार व स्तूप स्थापत्य व मुर्तिशिल्पांचे अवशेष आढळतात. प्रस्तुत प्रकरणात वाकाटककालीन स्थळे व तेथील पुरातत्वीय अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास केला आहे.

## नांदेड :

मराठवाड्यात असलेल्या आठ जिल्ह्यापैकी नांदेड हे एक जिल्ह्याचे मुख्यालय असलेले ठिकाण आहे. औरंगाबाद जिल्ह्यानंतर नांदेड जिल्ह्यातच भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा मोठा वारसा प्राप्त झालेला आहे. नांदेड जिल्ह्यात कंधार, होट्टल, एरगी, येताळा, जुन्नी, अर्धापूर, लहान, करडखेड व नांदेड ही प्राचीन नगरे आहेत.

नांदेड या नगरास प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा महत्वाचा वारसा मिळालेला आहे. हे नगर गोदावरी नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेले असून या नगराचे प्राचीनत्व नंद - सातवाहन काळापर्यंत जाते. प्राचीन काळात नांदेड या नगरास पुढील नावांनी ओळखले जात होते.

नंदीतट[१]

नंदीकड[२]

नंदीनगर[३]

नंद्यज़्ल[४]

नंदीकट[५]

नांदीतट[६]

नंदीएड[७]

नंदीग्राम[८]

नंदआहार[९]

नवनंदडोरा[१०]

नंदी हे शिवाच्या गणाचे नाव आहे. नांदेड या नगराच्या नावाची व्युत्पत्ती नंदी या नावापासून झाली.

नंदवंश हा प्राचीन राजवंश असून या राजवंशाने उत्तर भारतात राज्य केले. या राज्याची राजधानी मगध होती.या राजवंशाने दक्षिण भारतावरही राज्य केले. पैठण ही त्यांची दक्षिण भारतातील राजधानी होती,[११] तर नंदआहार म्हणजेच नांदेड हे ठिकाण त्यांची उपराजधानी होती.[१२] या काळात नांदेड हे नंदआहार आणि नवनदंडेरा या नावाने प्रसिध्द होते. नवनंदडेरा या नावाचे अपभ्रंश रुप नंदेड-नांदेड असे आहे.[१३] डॉ. मोरवंचीकर रा. श्री यांच्या मते नांदेड ही नंद राजवंशाची दक्षिणेकडील सीमा असावी.[१४] सातवाहन काळात नांदेड हे नगर प्रसिध्द बौध्दपीठ होते. सांचीच्या स्तुपावरील दानलेखात नांदेड म्हणजेच नंदिनगराच्या अनेक बौध्द भिक्खु आणि भिक्खुणींनी दिलेल्या दानाचा उल्लेख आढळतो.[१५] अनेक भिक्खू व भिक्खुणीची नावे या दानलेखात आढळतात. यावरुन नांदेड हे सातवाहन काळात प्रसिध्द बौध्दपीठ असल्याचे स्पष्ट होते. नांदेड हे नगर अमरावतीहून विदिशाकडे जाणाऱ्या राजमार्गावर असलेले प्रमुख नगर होते. डॉ. प्रभाकर देव यांच्या मते नंदगिरी ही सातवाहनांची पहिली राजधानी होती.[१६]

वाकाटक घराण्याच्या दोन शाखा होऊन गेल्या.[१७] नंदिवर्धन येथील शाखा जेष्ठ होती, तर वत्सगुल्म येथील शाखा कनिष्ठ होती.[१८] वत्सगुल्म वाकाटक घराण्याने इ.स. ३३० पासून इ.स. ५१० पर्यंत राज्य केले. या काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते.[१९] कल्याणीचे चालुक्य, राष्ट्रकुट व कदंब राजवटीच्या काळात नांदेड हे प्रसिध्द शैक्षणिक केंद्र आणि विद्वानांचे माहेरघर

होते. या काळातील शिलालेखात एक वैभवशाली नगर म्हणून नांदेडचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कंधार ही राष्ट्रकुटांची राजधानी होती.[२०] कंधारपासून जवळच असलेल्या मानसपुरी येथे इ.स. १९५९ मध्ये राष्ट्रकूट सम्राट कृष्ण तिसरा याच्या काळातील एक शिलालेख मिळाला.[२१] या शिलालेखात प्रसिध्द शिक्षण केंद्र आणि एक वैभवशाली नगर म्हणून नांदेडचा उल्लेख केलेला आढळतो. या शिलालेखात नांदेडचा उल्लेख नांदितट या नावाने केलेला आहे.[२२] नांदेड येथील अग्रहारास कंधार येथून तेल, मीठ व दुधाचा पुरवठा केला जात असे.

वाकाटक काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्य केंद्र होते. याचा उल्लेख वत्सगुल्म शाखेतील वाकाटक राजा विंध्यशक्ती द्वितीय याच्या वाशिम ताम्रपटात आढळतो.[२३] वाकाटक काळात नांदेड येथे विषय विभागाचे मुख्य केंद्र असल्यामुळे या काळात नांदेड व परिसरात बौध्द आणि हिंदू मंदिर स्थापत्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली गेली. परंतु आज त्याचे केवळ पुरातत्वीय अवशेष आपल्याला काही ठिकाणी पहावयास मिळतात. नांदेड भागात मोठा व इतवारा वसाहत आहे. हेच प्राचीन नांदेड होय. गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या इतवारा वसाहतीत वाकाटक काळातील बौध्द विहार व नृसिंह मंदिर स्थापत्याचे भग्नावशेष आढळतात.

नांदेड या ठिकाणी प्राचीन नृसिंहाचे मंदिर गोदावरी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर होते. आज हे मंदिर उद्ध्वस्त झालेले आढळते. या मंदिराचे काही अवशेष होळी भागात नृसिंह गल्लीत पाहावयास मिळतात.[२४] या मंदिरात केवल नृसिंहाची मूर्ती होती. ही मूर्ती आनंदीदास लक्ष्मीकांत देशमुख यांच्या वाड्यात आहे. ही मूर्ती गोदावरी नदीच्या पात्रात मिळाली आहे. केवल नृसिंहाची ही मूर्ती द्विभूज व आसनस्थ असून १२२ सें.मी उंचीची आहे. नृसिंहाने डाव्या पायाची मांडी घातलेली आहे, तर उजवा पाय पंजावर टेकवून मांडी वर उचलेली आहे. या मांडीखाली १५ सें.मी. उंचीची प्रल्हादाची मूर्ती आहे. नृसिंहाचा डावा हात गुडघ्यावर टेकलेला आहे तर उजवा हातही गुडघ्यावर टेकलेला असून त्या हातात चक्र आहे, मनगटात कडे आणि दंडात बाजूबंद आहेत. नृसिंह द्विभुज असून ते ७.५ सें.मी. उंचीच्या आणि १२० सें.मी. लांब व ६० सें.मी. रुंदीच्या आसनावर आसनस्थ झालेले आहेत. आसनावर कमळ कोरले असून त्याखालच्या सिंहासनावर हत्ती कोरलेला आहे. ही मूर्ती वाकाटककालीन आहे.[२५]

वाकाटक राजे हिंदुधर्माचे उपासक होते. परंतु त्याने इतर धर्मालाही राजाश्रय दिला. या काळात वाकाटक राजाने बौध्दधर्माला राजाश्रय दिल्यामुळे बौध्द विहार व मुर्तीशिल्प मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. नांदेड येथे ब्रह्मपुरी भागात बौध्द विहाराचे अवशेष प्राप्त झाले होते.[२६] त्यामध्ये विहारातील दगडी स्तंभ, छताचे अवशेष व शिल्पावेष समाविष्ट होते. हा विहार वाकाटक काळातील विहार असावा. या काळात नांदेड हे दक्षिणेतील प्रसिध्द बौध्द पीठ होते. अनेक बौध्द भिक्खू व भिक्खुनीचे येथे वास्तव्य होते. उस्मानाबाद तालुक्यातील तेर हेही वाकाटक काळात प्रसिध्द बौध्द पीठ होते.[२७] त्याचप्रमाणे नांदेड येथेही बांधलेले विहार आढळून आले.

**भोकर :**

नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुके आहेत. त्यापैकीच एक भोकर हा तालुका आहे. भोकर हे ठिकाण नांदेड पासून ४० कि.मी. आंतरावर आहे. भोकर हे प्राचीन नगरअसून या ठिकाणी मंदिर, मुर्तीशिल्प आणि प्राचीन नागरी वास्तुचे अवशेष आढळतात. या ठिकाणी कळवातनीचा महाल, शिवमंदिर आणि प्राचीन जलाशयाचे अवशेष प्राप्त झाले आहेत. याठिकाणी वाकाटककालीन विटा मंदिरस्थापत्य व मूर्तीशिल्पाचे अवशेष आढळतात.

भोकर - किनवट रस्त्याच्या डाव्या बाजूस बौध्द मंदिर स्थापत्याचे अवशेष आढळतात. याठिकाणी गौतम बुध्दाची सुंदर प्रतिमा मिळाली.[२८] या प्रतिमेच्या आकारावरुन ती बौध्द मंदिरातील प्रतिमा असल्याचे प्रतिमेसमान आहे. अजिंठा काही लेण्यांचे खोदकाम आणि त्यामधील शिल्पकाम वाकाटक काळात झाले आहे.[२९] त्यावरुन भोकर येथील बुध्द प्रतिमा म्हणजे बौध्द विहार वाकाटक काळातील आहे, हे स्पष्ट होते.

**कंधार :**

नांदेड जिल्ह्यात असलेल्या एकूण सोळा तालुक्यापैकी एक तालुका म्हणजे कंधार होय. कंधार हे नगर महाराष्ट्रात असलेल्या प्राचीन नगरांपैकी एक असून ते मन्याड नदीच्या उत्तर किनाऱ्यावर अक्षांश १८°, ५२ उत्तर आणि रेखांश ७७°, १४ पूर्व वसले आहे. कंधार हे नगर नांदेडच्या दक्षिणेस ५२ कि.मी. अंतरावर बालाघाट डोंगराच्या उतरणीला वसलेले असून डोंगर उतरणीस येईपर्यंत हे नगर आपल्या दृष्टीस पडत नाही, हे या नगराचे वैशिष्ट्ये आहे.

कंधार नगरास प्राचीन इतिहास व संस्कृतीचा महान वारसा प्राप्त झालेला आहे. प्रागैतिहासिक कालखंडातही याठिकाणी मानवाची वस्ती होती. याचे पुरावे मन्याड नदीच्या खोऱ्यात आढळून आले आहेत. कंधार नगराची स्थापना महाभारत काळात झाल्याचे स्पष्ट होते. या काळात कंधार हे नगर पांचाळपूर,[३०] पांचाळपुरी[३१], पांचाळनगरी[३२] व पांचाळेश्वर[३३] इत्यादी नावाने ओळखले जात होते. महाभारत काळात कंधार परिसरात पांडव राजघाराण्याची सत्ता होती. या राजघराण्यात कन्हार नावाचा एक राजा होऊन गेला.यानेच कंधार नगराची स्थापना केली. त्यामुळे त्याच्याच नावावरुन या नगरास कन्हार असे नाव पडले. कन्हार या नावाचेच पुढे कंधार असे नाव रुढ झाले. हे नाव आजही कायम आहे. कंधारची स्थापना महाभारत काळात झाल्याचे स्पष्ट होत असले तरी त्याला ऐतिहासिक आधार नाही. राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला याने या नगराची स्थापना इ.स. ७५८ मध्ये केली.

पुरातत्वीय दृष्टिकोनातून कंधार नगराला फार महत्व आहे. कंधार व कंधारच्या परिसरात विविध कालखंडातील विभिन्न प्रकारचे पुरातत्वीय अवशेष आजही आपल्याला विखुरलेल्या अवस्थेत पाहावयास मिळतात. कंधारचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन डेक्कन कॉलेज, पुणे आणि महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या सहकार्याने डॉ. एम.के. ढवळीकर व डॉ. शोभना गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली येथे फेब्रुवारी- मार्च १९८२ मध्ये मानसपुरीजवळ उत्खनन करण्यात आले. या उत्खननात इ.स. ९०० मधील क्षेत्रपाल भैरवाच्या मंदिराचा संपूर्ण आराखडा प्राप्त झाला.[३४] पाषाणात घडविलेली क्षेत्रपाल भैरवाची ७२ फूट उंचीची मूर्तीही याच ठिकाणी मिळाली. इ.स. १९८६ मध्ये लालवाडी येथे पुन्हा उत्खनन करण्यात आले.[३५] उत्खननामध्ये घरगुती वापरातील वस्तु, खापरे, मातीची खेळणी, बांगड्यांचे तुकडे व मातीच्या भांड्यांचे अवशेष मिळाले आहेत. कंधार शहर व परिसरात हिंदू, बौध्द आणि जैन मंदिरांचे भग्नावेशष आणि मूर्तिशिल्पही पाहावयास मिळते. मूर्तिशिल्पामध्ये लज्जागौरी व सप्तमातृकांच्या मूर्ती विशेष उल्लेखनीय ठरतात. येथे प्राप्त झालेल्या अनेक बुध्दमूर्ती गांधार व सारनाथ कला परंपरेतील आहेत. सारनाथ येथे ८ विहार व ३ स्तुप आहेत.[३६]

कंधार येथेही ८ बौध्दविहार[३७] आणि ८ बौध्द स्तूप होते.[३८] यावरुन सारनाथप्रमाणेच कंधारही बौध्द धर्मप्रसाराचे व कलास्थापत्याचे प्रसिध्द केंद्र होते हे स्पष्ट होते. सारनाथ येथे धम्मेख स्तुपात ये धर्मा हेतु प्रभवा हा बौध्द मंत्र कोरलेला एक शिलापट्ट प्राप्त झाला.[३९] हाच आशय कोरलेला एक मूर्तीलेख कंधार येथेही प्राप्त झाला.[४०] यावरुन कंधारचे पुरातत्वीय महत्व स्पष्ट होते. १ मार्च २००७ पासून किल्ल्यातील मातीचा भराव काढण्याचे काम महाराष्ट्र शासन करीत आहे. यासाठी केलेल्या खोदकामात खंडोबाची मूर्ती व दैनंदिन वापरातील मातीची भांडी, सुरई, बोळके व मातीची खेळणी मिळाली आहेत.

वाकाटककाळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते आणि या विषय विभागातच कंधार या नगराचा समावेश होता. कंधार या नगराचा इतिहास राष्ट्रकुट काळापासून जात असला तरी राष्ट्रकुट काळापूर्वी सुध्दा कंधार हे नगर आस्तित्वात होते. या ठिकाणी वाकाटककाळातील कला व स्थापत्याचे अवशेष मोठ्या प्रमाणात आढळतात. वाकाटककाळात कंधार हे कला व स्थापत्याचे प्रमुख केंद्र होते.

याठिकाणी या काळातील बौध्द विहार, बौध्द मुर्तीशिल्प आणि बौध्दस्तुपाचे अवशेष आढळून आले. याठिकाणी कंधार, बाळांतवाडी आणि बुध्दटेकडी येथे वाकाटक काळातील बुध्दविहार व मूर्तीशिल्पाचे अवशेष आढळतात. औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा हेही वाकाटक काळातील कलेचे प्रमुख केंद्र होते.[४१] कंधार येथील शिल्पकला आणि वास्तुकला अजिंठा कलापरंपरेतील आहे. कंधार शहरात दर्गापुरा भागात वाकाटक काळातील बौध्द विहार होते.[४२] त्यांचे अवशेष येथील मिळाले आहेत. हे बौध्द विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती दुसरा ( इ.स. ३५५-४०० ) याच्या कारकिर्दीतील असावे. दर्गापुरा भागात सईदुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवर मकदूम सैया या अवलियांचा दर्गा आहे. हा दर्गा बडी दर्गा म्हणून ओळखला जातो. या दर्गाच्या वास्तुशेजारी एक प्राचीन वास्तू असून ती पाषाणात बांधलेली आहे. या वास्तुची बांधकाम शैली बौध्द कलापरंपरेतील आहे. पुढे सभामंडप आणि पाटीमागे गर्भगृह अशी, या वास्तुची रचना आहे. या गर्भगृहात गौतम बुध्दांची मोठी प्रतिमा असावी. गर्भगृह आणि सभामंडपाला आधार दिलेल्या दगडी स्तंभांवर ज्या प्रतिमा आहेत, त्या प्रतिमा बौध्द परंपरेतील आहेत. अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी

भागाची प्रतिकृती प्रतिमेच्या रुपाने येथील स्तंभावर कोरलेली आढळते. अजिंठा येथील सर्वच लेणी बौदधर्मीय आहेत. यावरुन कंधार येथील ही वास्तू सुध्दा प्राचीन बौध्द विहार होते, असा निष्कर्ष निघतो. या वास्तुमधील स्तंभांवर नागाचीही शिल्पे कोरलेली आढळतात. गौतम बुध्दांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू या बुध्दांची उत्तम प्रतीके समजली गेली. बुध्द व नाग यांचा संबंध जवळचा आहे. गया येथे ज्ञानप्राप्ती झाल्यावर गौतम बुध्द जवळच्या तळ्यातील मूचलिंद नागाकडे गेले. त्यावेळी पाऊस पडू लागला म्हणून मुचलिंदाने आपला फणा त्यांच्या डोक्यावर उभारुन त्यांचे ( गौतम बुध्दांचे) पावसापासून रक्षण केले.[४३] त्यामुळे बौध्द वास्तुंमध्ये नागांच्या प्रतिमा आढळतात. त्यावरुन ही वास्तू बौध्द विहार आहे, हे स्पष्ट होते. ही वास्तू पूर्णपणे दगडांनी बांधलेली आहे. पुढे बौध्द धर्माचा प्रभाव कमी झाला पुढे हिंदू धर्माचा प्रभाव वाढला. त्याचवेळी या बौध्द विहाराला हिंदू मंदिर बनविले. हेच हिंदू मंदिर म्हणजे कालप्रिय ( शिवमंदिर ) मंदिर होय. याच मंदिरात हाजी सरवर मकदूम सैया यांचे वास्तव्य होते. येथेच त्यांचा मृत्यू झाला. याच ठिकाणी त्यांचा दर्गा बांधण्यात आला. त्यामुळे बौध्द मंदिर अर्थात विहाराचे अस्तित्व संपुष्टात आला आहे.

कंधार तालुक्यात बाळांतवाडी नावाचे गाव आहे. हे गाव कंधारच्या पश्चिमेस कंधार - घोडज रस्त्यावर असून ते कंधारपासून ५ कि.मी. अंतरावर आहे. हे गाव ८०० लोकवस्तीचे अगदी लहान असले तरी या ठिकाणी प्राचीन शिल्पावशेष आढळतात. या गावाच्या उत्तरेस श्री शंकर संभाजी जाधव यांच्या शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावशेष आढळतात. या ठिकाणी आंब्याच्या झ ाडाखाली देवीची एक प्रतिमा आहे. ही प्रतिमा भवानी देवी म्हणून ओळखली जाते. एक बुध्दाची मस्तक तुटलेली पद्मसनस्थ मूर्ती व हत्तीची मूर्ती भग्न अवस्थेत आहे. येथील भग्नावशेषांचे सर्वेक्षण केले असता या ठिकाणी प्राचीन बौध्द विहार होते, हे स्पष्ट होते. याठिकाणी ५ फूट उंचीचे दोन स्तंभ असून हे दोन्ही स्तंभ आणि दर्गापुरा भागातील विहाराचे स्तंभ यांच्यात साम्य असून या दोन्ही स्तंभावर अजिंठा लेणी क्र. ९च्या दर्शनी भागाच्या प्रतिमा आढळतात. यावरुन असे दिसते की हा विहार वाकाटक सम्राट विंध्यसेन दुसरा यांच्या कारकिर्दीतील असावे.[४४]

गौतम बुध्दाच्या प्रतिमा निर्माण होण्यापूर्वी बुध्दाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अनेक प्रतीकांचा शोध घेण्यात आला. अशा परिस्थितीत बुध्दाच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू ह्या बुध्दाची उत्तम प्रतीके समजली गेली.[४५]मग या प्रतीकांच्या रुपानेच बुध्दाची उपासना सुरु झाली. बुध्दांच्या अनेक प्रतीकांपैकी हत्ती हा एक उत्तम प्रतीक समजला गेला.[४६] महामायादेवीच्या गर्भात ज्यावेळी तथागताने ( बुध्द ) प्रवेश केला, त्यावेळी तिला स्वप्नात पांढरा हत्ती दिसला होता. त्यामुळे हा हत्ती बुध्द जन्माचे प्रतीक आहे. याठिकाणी हत्तीच्या चार प्रतिमा पाहावयास मिळाल्या आहेत. याशिवाय येथे बुध्दाची एक खंडित प्रतिमाही आढळली. यावरुन स्पष्ट आहे की, येथे प्राचीन बौध्द विहार होते. बुध्द टेकडीवरील विहारापासून हा विहार केवळ अर्धा फर्लांगावर आहे. येथील भग्नावशेषातील हिंदू धर्मीय मूर्तिशिल्पही आढळले. येथे ६० सें.मी उंचीची व चतुर्भुज असलेली ध्यान मुद्रेतील देवीची प्रतिमा आहे. दोन हात अभय मुद्रेत आहेत तर दोन हात सरळ दोन्ही गुडध्यांवर ठेवलेले आढळतात. या प्रतिमेचे मस्तक खंडीत झाले आहे. या प्रतिमेशिवाय येथे आणखी एक स्त्री प्रतिमा आहे या प्रतिमेचीही उंची ६० सें.मी. आहे. याचठिकाणी एका मोठ्या शिळेवर त्रिशूल कोरलेले आहे. आज जरी हे हिंदूधर्मीय मंदिर वाटत असले तरी हे मंदिर मूळ बौध्द विहार होते.[४७] हिंदू धर्माचा प्रभाव वाढल्यानंतर व बौध्द धर्माचा प्रभाव नाहीसा झाल्यावर या बौध्द विहाराचे रुपांतर हिंदू मंदिरात करण्यात आले. इतर बौध्द विहारांच्या ठिकाणी जी बौध्दशिल्पे पाहावयास मिळतात. त्याच प्रमाणे बौध्दशिल्पे येथेही पाहावयास मिळतात. हीच बौध्दशिल्पे येथे बौध्द विहार असल्याचा प्रत्यक्ष पुरातत्वीय पुरावा आहे.

कंधार शहराच्या दक्षिणेस एक माळटेकडी आहे. ही टेकडी कंधार - घोडज रस्त्याच्या उजव्या बाजूस असून ती कंधारपासून २ कि.मी. अंतरावर आहे. ही टेकडी बुध्द टेकडी या नावाने ओळखली जाते. आज मात्र या ठिकाणी एक मुस्लिम तुरबत आहे. भुताची हा बुध्दाची या शब्दाचा अपभ्रंश आहे. येथे बौध्द विहार होते. या विहारातील बुध्दमूर्ती १२२ सें.मी. उंचीची होती. हे बौध्द विहार पूर्वाभिमुख असून त्याची पूर्व - पश्चिम लांबी ६२ फूट आणि दक्षिण - उत्तर रुंदी ५१ फूट होती. आज याठिकाणी बौध्द विहाराचे केवळ पुरातत्वीय अवशेष आढळतात. या ठिकाणी एक मुस्लीम तुरबत आहे. या तरबतचे कच्चे बांधकाम केलेले आहे. या बांधकामासाठी बौध्द विहाराच्या

बांधकामासाठी उपयोगात आणलेल्या दगडी शिळांचा वापर केलेला आहे. येथे बरेच बौध्द शिल्पावशेष आढळतात. परंतु ते सर्व खंडीत स्वरुपात आहेत. येथील विहाराच्या छताला आधार दिलेल्या दगडी खांबाचा खंडीत भाग येथे पाहावयास मिळतो. खांबाचा एक शीर्षभागही येथे पाहावयास मिळतो. २X२ फूटाच्या एका चौरसाकृती दगडावर कोरलेले कमळाचे फूल अत्यंत सुंदर आहे. हे शिल्प एखाद्या स्तंभाचा शीर्षभाग असावा. गौतम बुध्दाची पद्मासन अवस्थेतील तीन शिल्पे येथे आहेत, पण या शिल्पांना चुना लावल्यामुळे त्यांचे मूळ ऐतिहासिकत्व संपले आहे. या ठिकाणी एका २X२ फूटांच्या चौरसाकृती दगडावर चारही बाजूने अजिंठा येथील लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. अशी शिल्पे कंधारमध्ये सर्वत्र आढळतात. एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीसमान असलेल्या शिल्पांवर वरच्या बाजूस मध्यभागी एक वृक्ष आहे. हा बोधिवृक्ष आहे. बोधिवृक्ष हे बुध्दाच्या ज्ञानप्राप्तीचे प्रतीक आहे.[४८] यामुळे बौध्द कलापरंपरेत बोधिवृक्ष दाखविण्यात येतो. हा विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय ( इ.स. ३५५-४००) यांच्या काळातील असावा.[४९] कारण अजिंठा कला परंपरेतील बौध्दशिल्प येथे आढळून आली आहेत.

कंधारच्या परिसरात बौध्द विहार स्थापत्याप्रमाणेच स्तूप स्थापत्याची निर्मिती वाकाटक काळात झाली. या स्तूप स्थापत्याचे अवशेष याठिकाणी आढळुन आले. डॉ. अनिल कठारे यांनी या स्तूप स्थापत्याच्या अवशेषांचा प्रथम अभ्यास करुन त्यावर प्रकाश टाकला आहे.[५०]

चैत्यगृह, विहार आणि स्तूप हे बौध्द वास्तुकलेचे तीन प्रकार पडतात. प्राचीन भारतीय कला व वास्तुकलेत हे तिनही वास्तुप्रकार प्रचलित झाले. महाराष्ट्रात भाजे, कार्ले, अजिंठा, कोंडाणे, जुन्नर, पितळखोरा, धाराशिव, नाशिक, वेरुळ इत्यादी ठिकाणी डोंगर पोखरुन अर्थात खोदून चैत्यगृह, विहार व स्तूप या वास्तुंची निर्मिती केली गेली. चैत्यगृह, विहार व स्तूप जसे डोंगर खोदून तयार करण्यात आले त्याचप्रमाणे विटा, दगड व मातीने बांधूनही चैत्यगृह, विहार व स्तूप निर्माण करण्यात आले. हिनयान काळात बुध्दपूजा प्रचलित नव्हती, तर बुध्दाच्या काळात अनेक प्रतीकांची पूजा प्रचलित होती. तर अनेक प्रतीकांपैकी एक म्हणजे स्तूप होय.[५१] स्तूप हे बुध्दाच्या निर्वाणाच प्रतीक समजले जात असे.[५२] प्रामुख्याने बौध्द स्मारकासाठी स्तूप हा शब्द वापरला जातो.

अवशेषांवर बांधलेले स्मारक म्हणजे स्तूप होय.[५३] स्तूप हा बौध्द धर्माशी संबंधित असलेला एक वास्तुप्रकार आहे. स्तूप म्हणजे एखाद्या महापुरुषाची विशिष्ट आकाराची समाधी होय. या समाधीमध्ये त्या महापुरुषाचे शरीरावशेष ( अस्थी ) व त्याने वापरलेल्या वस्तुंचे अवशेष ठेवण्यात येत असत. थोडक्यात, एखाद्या महापुरुषाच्या दफनानंतर त्याच्या अवशेषांवर त्याच्या स्मरणार्थ तयार केलेल्या वास्तुला अर्थात स्मारकाला स्तूप अशी संज्ञा प्राप्त झाली. एखाद्या महापुरुषाची स्मारकरुप समाधी म्हणजे स्तूप अशीही स्तुपाची व्याख्या करता येते. स्तूप हा संस्कृत शब्द आहे. जोडणे किंवा एक करणे आणि प्रशंसा करणे किंवा स्तवन करणे असे स्तुपाचे दोन अर्थ आहेत.[५४] त्यावरुन लोकांची श्रध्दा असणारे स्मारक उभारणे असा स्तुपाचा अर्थ काढता येतो. शारिरीक, पारिभोगिक व उद्देशिक असे स्तूपाचें तीन प्रकार कल्पिले गेले. मौर्य सम्राट अशोकाने बौध्द स्तूप निर्मितीस प्रारंभ केला. ही परंपरा पुढेही चालू राहिली. वाकाटक काळात कंधार परिसरात बुध्द टेकडी व बाळांतवाडी येथे बौध्द स्तूपाची निर्मिती करण्यात आली होती. त्याचे अवशेष येथे मिळाले आहेत.

कंधारच्या दक्षिणेस कंधार - घोडज रस्त्यावर कंधारपासून २ कि.मी. अंतरावर उजव्या बाजूस एक माळटेकडी आहे. ही माळटेकडी चारजमुनी माळालगत आहे. ही माळटेकडी बुध्दटेकडी या नावाने ओळखली जाते. या माळटेकडीच्या उतरणीस बौध्द विहार[५५] आणि पूर्वेस बौध्द स्तुपाचे अवशेष मिळाले.[५६] आज याठिकाणी केवळ बौध्द शिल्पावेशष पाहावयास मिळतात. येथील शिल्पावशेष आणि परिसराचे अवलोकन केले असता असे दिसते की, टेकडीच्या वरच्या बाजूस विहार आणि खालच्या बाजूस स्तूप होता. हा स्तूप मानसपुरी येथील स्तुपाच्या तुलनेत आकाराने थोडा मोठा असावा. या स्तुपाचे बहुतेक बांधकाम दगड व मातीने केलेले असावे. केवळ अर्धगोलाकार अंड हा भाग विटांनी बांधलेला असावा. या स्तुपाला एकच प्रवेशद्वार असावे. या प्रवेशद्वाराचा अर्थात तोरणाचा दगडी भग्नावस्थेतील स्तंभ येथे आढळून आला. येथे एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीत मध्यभागी बोधिवृक्ष दाखविला आहे.[५७] येथे मिळालेल्या स्तुपांच्या अवशेषात अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. यावरुन अजिंठा चैत्यगृह आणि या स्तुपाचा कालखंड

एकच असावा. हा स्तूप वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय इ.स. ( ३५५-४००) यांच्या काळातील असावा. या काळातील भरपूर शिल्पावशेष येथे आढळतात.

कंधार तालुक्यात कंधारच्या पश्चिमेस कंधारपासून साधारणपणे ५ कि.मी. अंतरावर कंधार-घोडज रस्त्याच्या उजव्या बाजूस काही अंतरावर बाळांतवाडी नावाचे एक खेडेगाव आहे. या गावाच्या उत्तरेस एका शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावेशष आढळतात. हे भग्नावशेष आणि शिल्पावशेष हिंदू व बौध्द धर्माशी संबंधित आहेत. याचठिकाणी एक बौध्द विहार होते. या विहाराच्या जवळच बौध्द स्तुपाचे भग्नावशेष आढळतात. याठिकाणी बौध्दस्तुपाच्या त्रिदली तोरणाचे अवशेष आढळून आले. याठिकाणी ५ फूट उंचीचे व १$^{१}/_{२}$ फूट चौरस आकराचे २ स्तंभ आणि ७ फूट उंचीचे व १$^{१}/_{२}$ फूट चौरस आकाराचे ४ स्तंभ प्राप्त झाले आहेत. या स्तंभावर अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार चैत्यकमानी आहेत. पदविन्यास पाहता या स्तुपाचा व्यास ३० फूट असावा. अंड, वेदिका, हर्मिका, छत्रावली व प्रदक्षिणापथ हे सर्व स्तुपाचे घटक येथे अवशेषरुपाने आढळतात.[५८] याच ठिकाणी हत्तीची ४ शिल्पे व बुध्दाची खंडीत मूर्ती प्राप्त झाली आहे.[५९] प्राप्त शिल्प शैलीवरुन हा स्तूप वाकाटक सम्राट विंध्यशक्ती दुसरा याच्या काळातील असावा.

### बहाद्दरपुरा :

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात बहाद्दरपुरा नावाचे ऐतिहासिक खेडेगाव आहे हे गाव कंधार - मुखेड रस्त्यावर असून कंधार पासून २ कि.मी. अंतरावर आहे. बहाद्दरपुरा या गावचे प्राचीन नाव भद्रपूर आहे.[६०] मौर्य काळात जैन पंडित भद्रबाहू व मौर्य सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांनी श्रवणबेळगोळ येथे जाताना बहाद्दरपुरा येथे वास्तव्य केले होते. त्यामुळे या गावास भद्रपूर हे नाव मिळाले. मोगलकाळात किल्लेदार बहादूरखान यांनी बहाद्दरपुरा वसाहतीचा विकास केला. त्यामुळे त्याच्याच नावावरुन भद्रपूरचे नाव बहाद्दरपूरा असे पडले.[६१] याठिकाणी वाकाटककालीन मूर्तिशिल्प आणि मंदिरे स्थापत्याचे अवशेष येथे आढळतात. बहाद्दरपुरा येथे राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालय आहे. येथे वाकाटककालीन अजिंठा कला परंपरेतील विहार स्थापत्याचे अवशेष आढळतात. वाकाटक काळात गौतम बुध्दाच्या मूर्ती प्रमाणेच बोधिसत्वाच्याही मूर्ती बनविल्या गेल्या. बोधिसत्व

म्हणजे बोधी प्राप्त करण्याची इच्छा करणारा व्यक्ती. बुध्दत्व प्राप्त करण्याच्या प्रयत्नात बुध्दत्वाकडे अग्रेसर होत असताना गौतम बुध्दाने अनेक जन्म धारण केले. बोधिसत्व हा मनुष्यापेक्षा सर्वोच्च मानला जातो ; परंतु ते बुध्दत्वापर्यंत पोहोचू शकले नाहीत. ते बुध्दत्व प्राप्तीकडे अग्रेसर राहिले आहेत. मूर्तिकलेत बोधिसत्वाचे अंकन पूर्णपणे राजकुमाराप्रमाणे केलेले नाही ; परंतु ते मुकूट मंडीत व आभूषणाने अलंकृत दाखविलेले आहेत. बेधिसत्वाची जी कल्पना केली आहे. त्यामध्ये त्यांचा संबंध अमिताभ, अक्षोम्य, रत्नसंभव, अमोघसिध्द व वैरोचन या पाच ध्यानी बुध्दांशी जोडलेला आहे. प्रत्येक बोधिसत्व मूर्तिकेलेत आपल्या ध्यानी बुध्दावरुन ओळखला जातो. बोधिसत्वाच्या मुकूटावर ध्यानी बुध्दाचे अंकन केलेले असते. हे ध्यानी बुध्द मूर्तिकलेत अवलोकितेश्वर, सिध्दैयकवीर, मुंजूश्री, मैत्रय व संबर हे पाच बोधिसत्वाचे रुप आहे. बोधिसत्वाच्या मुद्रा भूमीस्पर्श, वरद, अभय व धम्मचक्र प्रवर्तन अशा स्वरुपात आढळतात. वाकाटक कालीन मूर्तिकलेत अवलोकीतेश्वर, मंजूश्री व मैत्रय या बोधिसत्वाच्या मूर्ती पाहावयास मिळतात. या बोधिसत्वाची अनेक रुपे आहेत. त्यापैकीच एक बोधिसत्व पद्मपाणी अवलोकीतेश्वर होय.

बहाद्दरपुरा येथील गणेश मंदिर वाकाटककालीन बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची सुंदर प्रतिमा आहे. १८० सें.मी. उंचीच्या ६० सें.मी. रुंदीच्या आणि ६० सें.मी. जाडी असलेल्या मोठ्या शिलेवर बोधिसत्व पद्मपाणिचे सुंदर शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प स्थानक स्थितीत असून त्याची उंची १५० सें.मी आहे. पद्मपाणिच्या मस्तकावर मुकूट, गळ्यात मण्याची माळ, दंडात बाजूबंद, कमरेवर मेखला व हातात कंगण आहे. उजवा हात अभयमुद्रेत असून त्याच हातात कमळाचे फुल ( पद्म ) आहे. डावा हात वरमुद्रेत आहे. मुकूटावर ध्यानी बुध्द अमिताभचे अंकन केले आहे. तर उजव्या बाजूस अमोघसिध्दीची १२० सें.मी. उंचीची स्थानक प्रतिमा आहे. पद्मपाणिच्या मुकुटाच्या वरील बाजूस धर्मचक्र प्रवर्तन मुद्रा आहे. पद्मपाणीची उभे राहण्याची विशिष्ट शैली चांगलीच नजरेत भरते.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात मानसपुरी येथे बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची एक खंडीत मूर्ती मिळाली. ही मूर्ती तेथील मारुती मंदिराजवळ असलेल्या पिंपळाच्या झाडाच्या बुडाला ठेवण्यात आली होती. या मूर्तीच्या कमरेच्या वरचा भाग मिळाला. या

मूर्तीचे मस्तकही खंडीत झालेले आहे. बोधिसत्वाच्या हातात पद्म आहे. या मूर्तीचा खालचा भाग येथेच भीमनगर वसाहतीत मरीआईच्या ओट्यावर आढळून आला आहे. प्राप्त अवशेषावरुन या मूर्तीची उंची १०५ सें.मी. आणि जाडी ३० सें.मी. असावी.

## अजिंठा :

औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात अजिंठा हे गाव आहे. अजिंठ्याच्या डोंगरात हीनयान आणि महायान पंथीय बौध्द धर्माच्या एकूण तीस लेण्या आहेत. औरंगापादपासून अजिंठा ११० कि.मी. तर जळगावपासून ६० कि.मी. अंतरावर आहे. अजिंठा लेणी जगप्रसिध्द आहेत. इंध्याद्री किंवा अजिंठ्याचे डोंगर या नावाने ओळखली जाणारी मराठवाड्याच्या उत्तर सरहद्दीवरील सह्याद्रीची जी रांग आहे, तिच्या अजिंठा लेणीच्या परिसरातील शाखेला मंदार हे नाव होते. या नावाचा उल्लेख अजिंठा लेणी क्रमांक १६ मध्ये असलेल्या वाकाटककालीन शिलालेखात आहे. थोडक्यात अजिंठ्याच्या डोंगराचे प्राचीन नाव मंदार होते. अजिंठा या गावाचे प्राचीन नाव अचिंत असे होते. बौध्द साहित्यात अचिंत विहार असा उल्लेख आढळतो. तेथील लेणी क्रमांक १७ मधील शिलालेखात तेथील चैत्य अचित या नावाच्या मंत्र्याने कोरल्याचा उल्लेख आहे. या नावावरुन अचिंत विहार हे नाव रुढ झाले असावे. इ.सनाच्या सातव्या शतकात अचिंत विहार हे दक्षिण भारतातील एक मुख्य बौध्दपीठ गणले जात होते. बुध्दभद्र, अचिंत्य, स्थविर अचल, धर्मदत्त व भद्रबंधू हे बौध्द पंडित या ठिकाणी राहत होते. बुध्दभद्र हे एका बौध्द आम्नायाचे संस्थापक होते, तर स्थविर अचलचा उल्लेख ह्यूएनत्संगाच्या प्रवासवर्णनात करण्यात आला आहे.

अजिंठा लेणींचा शोध इ.स. १८१९ साली लागला. मद्रास सेनेतील ब्रिटिश सैनिक शिकार करण्यासाठी अजिंठा परिसरातील अरण्यात आले, तेव्हा त्यांना तेथील लेणी दृष्टीस पडल्या. या लेणी पाहण्याचा जो केंद्रबिंदू आहे, त्यास व्ह्यू पॉईंट म्हणतात. येथून सर्व लेणी सहजपणे दिसतात. अजिंठ्याच्या ज्या डोंगरात या लेणी कोरल्या आहेत तो डोंगर घोड्याच्या नालेच्या आकाराचा असून तो दोनशे पन्नास फूट उंचीचा अर्धवर्तुळाकार डोंगर आहे. येथूनच वघोरा नदी वाहते. सर जेम्स अलेक्झांडर यांनी जंगलात प्रवेश करुन या लेणी प्रसिध्दीस आणल्या.[६२] १९५१ मध्ये अजिंठा व

वेरुळ लेणींना राष्ट्रीय स्मारक म्हणून भारत सरकारने घोषित केले. यानंतर दोन वर्षानी या लेणी भारतीय पुरातत्व विभागाकडे सोपविण्यात आल्या.

वाकाटक राजांनी बौध्द धर्मास आश्रय दिला. अजिंठा याठिकाणी ३० बौध्द लेणी खोदविल्या गेल्या. त्यापैकी लेणी क्रमांक एक, दोन, सोळा, सतरा व एकोणिसचे खोदकाम वाकाटक काळात झाले. अजिंठा लेणी क्रमांक १६ च्या खोदकामासाठी वाकाटक सम्राट हरिसेन यांचा सचिव हस्तिभोज यांचा पुत्र वराहदेव यांनी अर्थसहाय्य केले.याच लेणीतील शिलालेखात त्याचा आणि वत्सगुल्म शाखेचा उल्लेख आढळतो. अजिंठा लेणी क्रमांक सोळा आणि सतरामध्ये लेणीच्या भिंतीवर व छतावर वाकाटक काळात चित्रकाम केले गेले. येथील चित्रशिल्प जगप्रसिध्द आहे. आज याठिकाणी असलेली चित्रकला नष्ट होत चालली असून त्याचे केवळ आज अवशेष बाकी राहिलेले आहेत. येथील लेणीत व लेणीच्या दर्शनी भागावर बौध्द धर्माशी संबंधित शिल्पकाम करण्यात आले आहे. यामध्ये बुध्दमूर्तीचाही समावेश होतो. लेणी क्रमांक एकच्या दर्शनी भागावर गौतम बुध्दाच्या गृहत्यागाचा आणि ज्ञानप्राप्तीचा प्रसंग शिल्पबध्द केला आहे. येथील चित्रकला आणि शिल्पकलेच्या अवशेषांवरुन वाकाटककालीन पोषाख, अलंकार, केसरचना, स्त्री - पुरुषांची शरीररचना, इत्यादीविषयक माहिती मिळते.

**वेरुळ :**

औरंगाबाद जिल्ह्यात खुलताबाद तालुक्यात वेरुळ हे एक गाव आहे. औरंगाबाद पासून हे ठिकाण २८ कि.मी. अंतरावर आहे. येथील डोंगरात खोदलेल्या लेणी जगात प्रसिध्द आहेत. येथील लेणी चरनाद्री पहाडच्या खोऱ्यात कोरलेल्या असून त्या उत्तर - दक्षिण दिशेत दोन कि.मी. अंतरावर पसरलेल्या आहेत. अजिंठा लेणीच्या खोदकामानंतर वेरुळच्या लेणीचे खोदकाम झाले. या लेण्यांच्या खोदकामाचा काळ इ.स. सहावे शतक ते नववे शतक असा आहे. चरनाद्री पहाडाला इंध्याद्री पर्वताच्या टेकड्या या नावानेही ओळखले जाते. इंध्याद्री टेकड्या या सह्याद्री पर्वताच्या रांगांशी संबंधित आहेत. वेरुळचे प्राचीन नाव एलापूर असून या नावाचा पहिला उल्लेख राष्ट्रकूट राजा कर्क दुसरा याने दान दिलेल्या बडोदा ताम्रपटात आढळतो.[६३] वेरुळालाच एलोरा असेही नाव आहे. डॉ. फ्लिट यांच्या मते वेरुळ हे नाव वेलुरा ( Vellura ) या शब्दापासून पुढे बनले आहे.

अरब भूगोलशास्त्र अल - मास उदी ( Al-mas-udei) याने इ.सनाच्या दहाव्या शतकात वेरुळ येथे लेणी असल्याचा सर्वप्रथम उल्लेख्र केला. महमूद कसित फरिस्ता या मुस्लिम इतिहासकारानेही वेरुळ लेणीची माहिती दिली.[६४]

वेरुळ हे वाकाटककालीन कला आणि स्थापत्याचे केंद्र होते. याठिकाणी हिंदू, जैन आणि बौध्द लेणी आहेत. येथील लेण्यांची संख्या साठ ते ६५ आहे. परंतु केवळ ३४ लेणींनाच क्रमांक दिलेले आहेत. या ३४ लेणीपैकी १२ लेणी बौध्द, १७ लेणी हिंदू आणि ५ लेणी जैन लेणी आहेत. वेरुळ येथील सर्व लेणींमध्ये वाकाटक काळात खोदण्यात आलेल्या याच पाच लेणी प्राचीन आहेत. ह्यापैकी काही लेणी चांगल्या स्थितीत आढळतात. तर काही लेणी अवशेष रुपाने पाहावयास मिळतात.

**उस्मानाबाद :**

मराठवाड्यात असलेल्या आठ जिल्ह्यापैकी उस्मानाबाद हा एक जिल्हा आहे. उस्मानाबाद हे नगर प्राचीन असून त्यास प्राचीन इतिहास संस्कृतीचा वारसा प्राप्त झालेला आहे. उस्मानाबादच्या परिसरावर सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट कल्याणीचे चालुक्य आणि देवगिरीच्या यादव घराण्याने राज्य केले. याठिकाणी वाकाटककालीन लेणी स्थापत्य आढळते. यापैकी काही लेणी चांगल्या स्थिती आढळतात तर काही लेणी अवशेषरुपाने पाहावयास मिळतात.

उस्मानाबादचे प्राचीन नाव नागसेननगर होते. पुढे नागसेननगर हे नाव मागे पडून धाराशिव असे नाव पडले. इ.पू. काळात राजा करकंड याने धाराशिव ( धारापूर ) नगराची स्थापना केली.[६५] करकंड हा अंग देशातील चंपापुरीचा राजा होता. त्याने दक्षिणेत चेर, चोल व पांड्य या राजवटीविरुध्द मोहीम काढली होती. इ.स. १९०४ पर्यंत जिल्ह्याचे मुख्य केंद्र नळदुर्ग होते. शेवटचा निजाम मीर उस्मान अली ख्रान यांच्या काळात ते धाराशिव येथे हलविण्यात आले. मीर उस्मान अलीच्या नावावरुन धाराशिव या नगरास उस्मानाबाद असे नाव देण्यात आले.

मराठवाड्यातील सर्वात प्राचीन लेणी उस्मानाबाद पासून तीन मैलावर असलेल्या हातलादेवीच्या डोंगरात आहेत. या लेणी शैव असून त्यांना चांभार लेणी म्हणतात. तसेच

उस्मानाबादच्या ईशानयेला सुमारे बारा मैल अंतरावर खानापूर गावाजवळील डोंगरात सात जैन लेणी आहेत. या लेणी दाबर लेणी किंवा थोरल्या लेणी म्हणून ओळखल्या जातात. उत्तराभिमुखी चार व ईशान्याभिमुखी तीन अशा एकूण सात लेणी आहेत. त्यापैकी लेणी क्रमांक दोन आणि तीन या बौध्द लेणी असून त्या वाकाटक काळातील आहेत. कला व स्थापत्य क्षेत्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून धाराशीव लेणी ओळखली जाते.

विविध अलंकार बनविण्याचे कारखाने व नाण्याची टाकसाळ अस्तित्वात होती.
या नगरीचे उल्लेख बौध्द, जैन व हिन्दु आणि या तिन्ही धर्माच्या वाड्मयात आलेले आहेत. टॉलेमी आणि पेरिपल्स या ग्रीक साधनांतही या नगराचे वर्णन आलेले आहे. यावरुन सातवाहन काळातील या शहराच्या समृध्दीची कल्पना येते. पैठणचा उल्लेख असलेले सर्वात प्राचीन शिलालेख पितळखोरा, अजिंठा आणि सांची या ठिकाणी आढळतात. वाकाटकांच्या ताम्रपटात पैठणचा सुप्रतिष्ठितपुर असा उल्लेख करण्यात आलेला असून ते आहार विभागाचे मुख्य ठिकाण असल्याची नोंद करण्यात आली आहे. ह्युएनत्संगच्या वर्णनावरुन बदामीच्या चालूक्यांच्या राजवटीत या नगरास उत्तरेकडील उपराजधानीचा दर्जा प्राप्त होतो असे दिसते. उदय सुंदरी कथा आणि कथासरित्सागर या ग्रंथातील वर्णनावरुन सातवाहनोत्तर काळातही या शहराचे वैभव कायम असल्याचे प्रत्यंतर येते. राष्ट्रकुटांच्या ताम्रपटातील या नगराच्या वर्णनावरुन ते तीर्थक्षेत्र व विद्येचे केंद्र तसेच भूत्विविभागाचे मुख्य ठिकाण होते. यादवांच्या काळी पैठण म्हणजे दक्षिणेतील काशी समजली जात होती.

विविध प्रकारच्या साधनात पैठण येथील भव्य राजप्रासाद, गोदावरीच्या काठावरील रमणीय असे देवीकृत उद्यान, बाजारपेठा व उपनगराचे वर्णन, आढळते. उत्खननातील पुरावे त्यास दुजोरा देतात. यावरुन पैठण हे प्राचीन काळातील एक अतिशय वैभवशाली नगर असल्याची प्रचीती येते. स्थानपोथी मध्ये पैठण येथील ६५ ते ७० मंदिराची नावे देण्यात आलेली आहेत. जैनमुनी भद्रवाहू व कालकाचार्य, बृहत्कथाकार गुणाढ्य, ज्योतिष शास्त्रज्ञ वराहमिहिर आणि अनेक मराठी संत कवीचे वास्तव्य इथे होते. कैलासचा कलावंत कोकस हा देखील पैठणचाच अशाप्रकारे विविध काळात विविध क्षेत्रातील महान व्यक्ती इथे नांदल्या. वाकाटकांच्या ताम्रपटात पैठणचा उल्लेख

सुप्रतिष्ठितपूर या नावाने केला आहे.[६७] या काळात पैठण हे वैभवशाली नगर प्रसिध्द बाजारपेठ आणि व्यापारी केंद्र होते. त्यामुळे सर्वच क्षेत्रात पैठणचा विकास झाला. या काळात पैठण व परिसरात मोठ्या प्रमाणात हिंदू मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्प निर्माण करण्यात आले. आज त्याचे केवळ अवशेष काही प्रमाणात आढळतात. यामध्ये विष्णु, शिव आणि नृसिंह मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्पाच्या अवशेषांचा समावेश होतो.

## हिमायतनगर :

नांदेड जिल्ह्यात हिमायतनगर नावाचा एक तालुका आहे. हे नगर नांदेड - किनवट मुख्य रस्त्यावर असून नांदेड पासून ७५ कि.मी. अंतरावर आहे. हिमायतनगर ( वाढोणा ) प्राचीन इतिहास व संस्कृतीचा मोठा वारसा मिळालेला आहे ; परंतु या नगराची स्थापना नेमकी कोणत्या कालखंडात झाली. या बाबत पुरातत्वीय किंवा वाङ्मयीन लिखित स्वरुपाचा पुरावा उपलब्ध नाही, परंतु येथे प्राप्त झालेल्या पुरातत्वीय अवशेषावरुन आपणास या नगराच्या स्थापनेचा कालखंड निश्चित करता येतो. हिमायतनगर ( वाढोणा ) व परिसरात प्रचलित असलेल्या लोकपरंपरा, दंतकथा, आणि आख्यायीका नुसार या नगराचे अस्तित्व रामायण, महाभारत कालखंडापर्यंत पोहोचते. आख्यायीका, दंतकथा व लोकपरंपरा यांना ऐतिहासिक साधन मानता येणार नाही, परंतु त्यांच्यातील सत्यही नाकारता येत नाही. कारण लिखीत इतिहास म्हणजेच संपूर्ण इतिहास असेही म्हणता येणार नाही. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच लोकपरंपरा, अख्यायीका व दंतकथा यांना मौखिक साधन म्हणून त्यामधील केवळ सत्यता स्विकारली ; तर अज्ञात इतिहास आणि घटना इतिहासात येऊ शकतात आणि हिमायतनगर ( वाढोणा ) या नगराचा एक नवा इतिहास प्रकाशात येऊ शकतो. हिमायतनगर ( वाढोणा ) या ठिकाणी पांढऱ्यामातीची शेते, पाण्यावर तरंगणाऱ्या विटा मोठ्या प्रमाणात आणि काळी व गुलाबी रंगाची फिकट खापरे काही प्रमाणात मिळतात. यावरुन सातवाहन काळात हिमायतनगर ( वाढोणा ) चे अस्तित्व होते हे स्पष्ट होते. सातवाहन कालीन नाणे हे तेर येथील उत्खननात तसेच पेठण (प्रतिष्ठान ) भोकरदन, नांदेड या ठिकाणी मिळाले आहेत. विशेषत: येथील देखील हिमायतनगर ( वाढोणा ) नगराच्या उत्तरेस गावालगत एक नाला आहे. या नाल्याच्या बांधावर श्री भाऊराव ढोणे यांना एक सातवाहन कालीन नाणे प्राप्त झाले आहे. हे नाणे

आज श्री सटवाजीराव ढोणे ( गुरुजी ) यांच्याकडे आहे. या नाण्यावरुन सातवाहन घराण्याचे या नगरासी असलेले संबंध स्पष्ट झाले आहेत. म्हणूनच या नगराची स्थापना इ.स. पूर्व दुसऱ्या किंवा पहिल्या शतकात सातवाहन काळात झाली असे म्हणता येते.

हिमायतनगर ( वाढोणा ) च्या नावाला प्राचीन इतिहास आहे. या नगराचे मुळ आणि प्राचीन नाव वारणावत ( आरणावती ) होते. असे लोकपरंपरेनुसार म्हटले जाते. परंतु या नावाचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. वारणावत येथे पांडव आले असा उल्लेख महाभारतात आहे. परंतु महाभारतातील वारणावत वारणावती हेच नगर असेल असे स्पष्ट म्हणता येत नाही. वारणावत या नावाबद्दल या परिसरात काही दंतकथा, अख्यायीका आणि मौखीक परंपरा रुढ आहेत. या अख्यायिका नुसार हिमायतनगर ( वाढोणा ) या नगराचे प्राचीनत्व रामायण, महाभारत कालखंडापर्यंत जाऊन मिळाले. पांडव वनवासात असताना दंण्डकारण्यात वावरत होत. याच दंण्डकारण्यात या नगराचा समावेश होता. म्हणून हिमायतनगर ( वाढोणा ) येथे पांडवाचे वास्तव्य होते. असे म्हटले जाते. येथील प्रचलित असलेल्या एका आख्यायिकेनुसार पांडव अज्ञातवासात असताना त्यांना वारणावती येथे कौरवाकडून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. या नगरापासून जवळच असलेल्या टेंभीच्या माळावर एक मोठे भुयार आहे. हा भुयारी मार्ग माहूर येथे असलेल्या डोंगरातील पांडव लेणी जवळ निघतो. आणि याच भुयारी मार्गाने येथून पांडव माहूर येथे पोहोचले. असे म्हटले जाते. दुसऱ्या आख्यायिकेनूसार पांडवांना याच नगरात जाळण्याचा प्रयतन करण्यात आला. त्यावेळी पांडव टेंभी येथील भुयारी मार्गाने कंधार येथे पोहांचले. हा भुयारी मार्ग कंधारला निघतो, असेही लोकपरंपरेने म्हटले जाते. एक शेळ्या, मेंढ्या हाकणारा व्यक्ती जवळपास एक खंडी शेळ्या ( २०) टेंभीच्या माळावर चारत होता. अचानक त्याच्या शेळ्या त्या भुयारी मार्गाने पुढे गेल्या. त्यापैकी एक शेळी माहूर येथे निघाली, काही शेळ्या कंधारला निघाल्या असे म्हटले जाते आज येथे जे भुयारासारखे दिसणारे भगदाड आहे ते अबाबकराचे थडगे या नावाने ओळखले जाते. कंधारच्या परिसरात देखील पांडव कालीन अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. कंधार व कंधारच्या परिसरात पांडव वास्तव्यास असल्याचे अनेक ग्रंथातही लिखान केलेले आहे. कंधार आणि हिमायतनगर ( वाढोणा ) अंतर साधारणपणे १०० कि.मी. आहे. यावरुन हिमायतनगर ( वाढोणा )

या परिसरात असलेल्या आख्यायिकांना पुष्टी मिळते. म्हणजेच या नगरात पांडवाचे वास्तव्य असल्याचे स्पष्ट होते. म्हणून या नगराचे मूळ आणि प्राचीन नाव वारणावत ( आरणावती ) होते असे म्हणता येईल.

हिमायतनगर ( वाढोणा ) या नगराचे दुसरे नाव वाढवणे किंवा वाढोणा असेही आहे. मध्ययुगात माहूर येथे श्री विष्णूदास नावाचे संत होऊन गेले. या संताने हिमायतनगर ( वाढोणा ) येथील परमेश्वरदेवतेच्या रचलेल्या आरतीमध्ये या नगराचा उल्लेख वाढवणे असा केला आहे. पुढील काळात वाढवणे या नावाचा अपभ्रंश होऊन वाढोणा असे झाले आहे. आजही या परिसरातील लोक, तसेच जात्यावरील ओव्यामधुन स्त्रिया या नगराचा उल्लेख वाढवणे किंवा वाढोणा या नावानेच करतात. निजामकाळाच्या उत्तरार्धात वाढोणा या गावाचे नाव बदलून हिमायतनगर ( वाढोणा ) असे रुढ झाले. येथील काही वरिष्ठ व जेष्ठ नागरीकांच्या मते हैदराबादचा राजा निजाम, निजामाचा पुत्र किंवा त्यांच्या सरदाराच्या नावावरुन या नगराचे नाव बदलून त्यांनीच हिमायतनगर असे ठेवले असे म्हटले जाते. परंतु त्या संबंधीचा लेखी पुरावा उपलब्ध झालेला नाही. इ.स. १९०९ मध्ये या परिसरातील काही नेत्यांनी हिमायतनगर नगरास श्री परमेश्वरनगर असे नाव देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु यात त्यांना यश मिळाले नाही. नांदेड जिल्ह्यातील कंधार येथील माजी आमदार व खासदार डॉ. केशवराव शंकरराव धोंडगे यांनी गुरुवार दि. ४ फेब्रुवारी २०१० रोजी हिमायतनगरला भेट देऊन येथील मंदिरातील परमेश्वराचे दर्शन घेतले. तसेच परमेश्वर मंदिर ट्रस्ट व या नगरातील काही प्रतिष्ठीतासमवेत त्यांनी चर्चा केली पुढे ९ फेब्रुवारी २०१० रोजी जिल्हाधिकारी नांदेड यांना एक निवेदन देऊन हिमायतनगर ( वाढोणा ) चे नामांतर परमेश्वरनगर असे करण्याची मागणी केली आहे. हा या नगराच्या नावाचा थोडक्यात इतिहास म्हणता येतो. सातवाहन (शालीवाहन) यांच्या कालखंडात या हिमायतनगर (वाढोणा) नगराची स्थापना झाली. तेव्हापासून या नगराचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास सलगपणे मांडता येतो ; परंतु या पूर्वीही या परिसरात नागरी वस्ती होती हे मान्य करावे लागते. वाकाटक काळात हिमायतनगराचा समावेश नांदेड विषय विभागात होत होता. याठिकाणी वाकाटक काळातील हिंदू मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्पाचे अवशेष आढळतात. या अवशेषांत पुढील अवशेषांचा समावेश होतो.

१. मंदिराचे स्तंभ.

२. स्तंभशिर्ष.

३. विष्णूमूर्ती.

४. शिवमूर्ती

५. नृसिंह मूर्ती.

६. पार्वती मूर्तीशिल्प.

७. सप्तमातृका.

८. महिषासूरमर्दिनी.

९. राम.

१०. पद्मनाथ.

वाकाटक काळात हिमायतनगर हे वैभवशाली नगर आणि हिंदू धर्मपीठ होते.[६८]

उपलब्ध पुराव्यावरुन मी असे म्हणू शकतो की,, वाकाटक राजघराण्यांनी विदर्भातून दक्षिण भारताच्या भूभागावर राज्य केले. मराठवाडा हा प्रदेश दक्षिण भारतात समाविष्ट असून काही निवडक ठिकाणीच या काळातील पुरातत्वीय अवशेष आढळतात.या अवशेषावरुन वाकाटकांच्या सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

# संदर्भ सूची


१. Thosar H.S., Historical Geography of Maharashtra and Goa, 2004, p. 78.

२. Ibid

३. Journal of the Bombay Branch of royal Asiatic Society, p. 639.

४. Thosar H.S., Op. Cit., p. 79.

५. Ibid

६. Ritti Shrinivas and Shelke G.C. ( Edi.), Inscriptions from Nanded District 1968, No. 2.

७. काळे भगवान ( संपा. ), मराठवाडा काल आणि आज, १९८६, पृ. ७८.

८. Thosar H.S., Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, 1977, p. 102.

९. मोरवंचीकर रा.श्री, दक्षिणकाशी पैठण, १९८७, पृ.१०.

१०. Mukharjee R. K., Ancient India, 1990, p. 44.

११. मोरवंचीकर रा.श्री., पूर्वोक्त, पृ.१०.

१२. Mukharjee R.K., Op. Cit.

१३. Ibid

१४. मोरवंचीकर रा.श्री., पूर्वोक्त.

१५. Thosar H.S., Op. Cit., Appendix - B.

१६. देव प्रभाकर, स्थापत्य अवशेष, स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध, १९८६, पृ.३१.

१७. मिराशी वा.वि., वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, १९५७, पृ.१३.

१८. कित्ता.

१९. Eipgraphia Indica, Vol. XXVI, p. 137.

२०. Sircar D.C. ( Ed.), Select Inscriptions Vol.II, 1983, p. 514.

२१. Ibid

२२. Ibid

२३. Epigraphia Indica Vol XXVI, p. 137.

२४.. साखरे विजया, नांदेड जिल्ह्यातील पुरातत्व एक अभ्यास, जुलै २००८, पृ. १६९.

२५. कित्ता.

२६. Cousens Henry, Archaeological Survey of India, 1902-03,

p. 102.

२७. साखरे विजया, पूर्वोक्त, पृ.२४७.

२८. पाटील समुद्रगुप्त, भोकर येथील विलोभनीय भगवान गौतम बुध्दाची प्रतिमा, जानेवारी १९९८, पृ.४४.

२९. मिराशी वा.वि., वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, १९५७, पृ.१४१, १५३.

३०. दास मारुती विरचित, अथ श्रीसाधू सुधा, खंदार, शके - १९०७, अध्याय-४, श्लोक -४४.

३१. कित्ता, अध्याय - ३, श्लोक - १९

कित्ता, अध्याय -४, श्लोक - ५४.

३२. शेंडगे एम.व्ही. ( संपा. ), रौप्य महोत्सवी स्मरणिका, १९८६, पृ.१.

३३. अथ श्री साधूसुधा, अध्याय -२, श्लोक - ४.

३४. Kandhar Excavation - A report, 1982.

३५. Ibid. P.1986.

३६. अग्रवाल वासुदेवशरण, सारनाथ, दिल्ली, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, १९९२, पृ.१७-२०.

३७. कठारे अनिल, राष्ट्रकूटकालीन बौध्द विहार, भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल - जून २००४, पृ.१८-२५.

३८. पवार दत्ता ( संपा. ), भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, २००७, पृ.२८-३५.

३९. अग्रवाल वासुदेवशरण, पूर्वोक्त, पृ.१९.

४०. Ritti Shrinivas and Shelke G.C. ( Edi.), No.1.

४१. Dhavlikar Madhukar, Ajanta, A Cultural Study, 1973, p. 112.

४२. Kandhar through Epigraphy and Archaeology - Journal of Epigraphical Society of India, Vol VII, 1980, p. 23.

४३. दळवे अरुण, राष्ट्रकुटकालीन कंधार, २००४, पृ.१९५.

४४. साखरे विजया, पूर्वोक्त, पृ.२५१.

४५. जोशी नि.पू., भारतीय मूर्तिशास्त्र, १९७९, पृ.३६१, ३६६.

४६. कित्ता, पृ. ३६३.

४७. Indian Archaeology - A Review, 1937-38, p. 96.

४८. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.३६२.

४९. साखरे विजया, पूर्वोक्त, पृ२४३.

५०. कठारे अनिल, कंधार येथील बौध्द स्तुप - पुरातत्वीय आढावा. २००७, पृ. २८-३५.

५१. जोशी नि.पू., पूर्वोक्त, पृ.३६३.

५२. कित्ता.

५३. पाठक अ.शं. ( संपा. ), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ, खंड -१, भाग - २, स्थापत्य व कला, २००२, पृ. २९८.

५४. मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, १९९३, पृ. १९१.

५५. Indian Archaeology- A Review, Delhi, 1937-38, p. 96.

५६. Ibid. P -98

५७. Ibid. P -102

५८. Ibid. P -96-99

५९. Archaeological Survey of India, Delhi, 1958, p. 107.

६०. दळवे अरुण; राष्ट्रकूटकालीन कंधार, २००४.

६१. कित्ता.

६२. Pathu T.V. & Prasad V.R.N., Ajanta- Ellura and aurangabad caves - An Appreciation, 1972, p. 10.

६३. Pathu T.V., Ellura - Art and cuture, 1980, p. 8.

६४. Ibid. P -3

६५. कठारे अनिल व नगराळे एन.एन, १९९९, पृ. ३२०.

६६. ठोसर हरिहर, प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व, काळे भगवान संपादित मराठवाडा काला आणि आज, १९८६, पृ. ८१.

६७. Thosar H.s., Op., Cit, pp. 151-55.

६८. कदम वसंत, ऐतिहासिक हिमायतनगर, २००१, पृ.२०.